

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित

# जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय दर्यापूर, जि. अमरावती

NAAC Re-acredited 'B'


मराठी विभागाद्वारा आयोजित

## राष्ट्रीय परिषद
(National Conference)

## समाज आणि साहित्य

(आधुनिक भारताच्या विकासात समाजसुधारक, विचारवंत आणि साहित्यिकांचे योगदान)

**बुधवार, दिनांक २८ फेब्रुवारी २०१८**



# विचारवेध

आधार पब्लिकेशन्स् अॅन्ड रिसर्च सेंटर, अमरावती यांचे संयुक्त विद्यमाने

★ एक दिवसीय राष्ट्रीय चर्चा सत्र
समाज आणि साहित्य
(आधुनिक भारताच्या विकासात समाजसुधारक,
विचारवंत आणि साहित्यिकांचे योगदान)

★ संपादक
डॉ. मि. ना. भिलपवार
डॉ. वि. अ. कोकणे
प्रा. सं. ज. आगलावे

★ प्रकाशन दिनांक
२८ फेब्रुवारी २०१८

★ मुद्रक
आधार पब्लिकेशन अमरावती

★ मुखपृष्ठ संकल्पना
विलास पवार
सरिता ग्राफिक्स, अमरावती

★ ISBN – 978-93-86623-44-7

★ प्रकाशक
आधार सोशल रिसर्च अॅन्ड डेव्हलमेंन्ट ट्रेनिग इन्स्टिटयूट,न्यु हनुमान नगर पाठय पुस्तक मंडळा समोर व्हि.एम.व्हि.रोड,अमरावती-४४४६०४
aadharpublication@gmail.com Mob-9595560278

★ मुल्य १५० रु

# INDEX


| | Author | Title of Research Paper | Pg.No. |
|---|---|---|---|
| 1 | डॉ. अतुल टेवरे | ज्ञानेश्वर : समाज रक्षक संतकार्य | 1 |
| 2 | संदिप धन्यकुमार आंबेकर | संत, पंत, तंत, लोकसाहित्य व समाजप्रबोधन. | 3 |
| 3 | प्रा.डॉ.प्रमोद दामोदर देवके | संत साहित्याचा समाजावरील प्रभाव | 8 |
| 4 | प्रा. लक्ष्मण भिकाजी कोठावळे | संतसाहित्य आणि समाज प्रबोधन | 11 |
| 5 | प्रा.डॉ. संतोष तुकाराम कदम | महात्मा जोतिबा फुले यांची हंटर आयोगासमोरील साक्ष | 15 |
| 6 | प्रा. डॉ. द. के. गंधारे | समाजसुधारक महात्मा फुले यांचे वैचारिक साहित्य व समाजपरिवर्तन | 20 |
| 7 | प्रा.डॉ.हरिदास आखरे | संत साहित्यातील समाज प्रबोधन | 24 |
| 8 | प्रा.डॉ.शरद वाघोळे | नव्वदोत्तरी ग्रामीण साहित्यातील बदलते समाजजीवन | 28 |
| 10 | प्रा. अनिल स. बाभूळकर | साठोत्तरी काळातील वैदर्भीय मराठी कवितेतील कृषिनिष्ठ जाणिवा | 32 |
| 11 | प्रा.रवींद्र दे.डाखोरे | महात्मा फुले यांचा मराठी ग्रामीण साहित्यावरील प्रभाव | 37 |
| 12 | प्रा. सुधाकर प्र. खंडारे | आधुनिक भारताच्या घडणीत समाजसुधारकांचे योगदान | 40 |
| 13 | डॉ. पंकज वानखडे | महात्मा फुले यांचा बुद्धिप्रामाण्यवाद | 42 |
| 14 | मिलिंद नामदेवराव भिलपवार | लोकसाहित्याच्या अभ्यासाची व्याप्ती | 45 |
| 15 | प्रा. डॉ. ममता जानराव इंगोले | अण्णा भाऊ साठे यांच्या कथा-कादंबऱ्यातील नायिका | 47 |
| 16 | प्रा. विवेक गं. देशमुख | संत साहित्य व समाज प्रबोधन | 53 |
| 17 | दिवाकर भिमराव पेठे | आधुनिक भारताच्या घडणीत डॉ. पंजाबराव देशमुख यांचे योगदान | 55 |
| 18 | प्रा. सारिका दादाराव पाचराऊत | मराठी ग्रामीण कविता | 57 |
| 19 | राहुल मनोहरराव बेहेरे | आधुनिक भारताच्या घडणीत महात्मा गांधीजीचे योगदान | 61 |
| 20 | प्रा. डॉ. रणजीत गणोदे | विनोदातून प्रकट होणारी समाजावस्था | 63 |
| 21 | प्रा. अशोक महादेवराव गवई | आधुनिक भारताचे समाजसुधारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्थिक विचार | 66 |
| 22 | रविंद्र दत्तात्रय मानकर | आधुनिक भारताच्या घडणीत नेहरू युगाची (सन १९४७-१९६४) प्रासंगिकता | 68 |
| 23 | डॉ. अविनाश. श. धोबे | राष्ट्रसंतांचे आर्थिक चिंतन व आजचे समाजवास्तव | 70 |
| 24 | प्रा. डॉ. गजानन गोपाळराव हेरोळे | आधुनिक मराठी साहित्य आणि कविता | 75 |
| 25 | प्रा. डॉ. विनोद अवधूतराव कोकणे | म. फुले यांचे स्त्री स्वातंत्र्यासंबंधी विचार. | 77 |

ISBN – 978-93-86623-44-7

# अण्णा भाऊ साठे यांच्या कथा-कादंबऱ्यातील नायिका

**प्रा. डॉ. ममता जानराव इंगोले**

सहयोगी प्राध्यापक तथा भाषाविभाग प्रमुख, डॉ. एच.एन.सिन्हा महाविद्यालय पातूर, जि. अकोला.

**प्रस्तावना -**

साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून ते तळागाळातील शोषित, पीडित, दलित माणसाच्या उत्थापनाचेही माध्यम आहे. हे मानणाऱ्या अण्णा भाऊ साठेंचे ध्येयवादी मन अखिल भारतीयांच्या, वर्गीकृत जातीतील पुरुषांच्या, स्त्री जातीच्या सुधारणेविषयी आणि उत्थानाविषयी सतत जागरुक होते. या देशातील विषमतावादी जग बदलण्यासाठी बहुजनांचे मन, मेंदू, मनगट बळकट करण्यासाठी अण्णा भाऊंनी आपली लेखणी झिजवली. 'पुरुषांचा स्वाभिमान, स्त्रींचं शील आणि देशाचं स्वातंत्र्य' हाच त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू होता. 'बहुजन हिताय- बहुजन सुखाय' या दृष्टीकोनातूनच त्यांनी साहित्यनिर्मिती केली. 'न्यायाची चाड आणि अन्यायाची चीड' हा अण्णा भाऊंनी घेतलेला वसा होता. या देशातील बहुजन, अस्पृश्य, स्त्री या घटकांनाही माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळायला हवा. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्यांना स्वातंत्र्य, समता, बंधुता हवी यासाठी त्यांनी आपल्या साहित्याच्या आविष्करणातून मुक्तीसाठी आणि पर्यायाने मानवमुक्ती लढा सुरु ठेवला.

स्त्रीच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या अण्णाभाऊ साठेंना कळून चुकले होते की कोणत्याही समाजाची उन्नती करायची असेल तर त्या समाजातील स्त्रीयांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. कोणत्याही समाजातील स्त्रीयांचा दर्जा हा त्या समाजाच्या सुधारणांचा मापदंड असतो म्हणूनच समाजपरिवर्तनाचे वेध लागलेल्या अण्णाभाऊ साठेंनी स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करतांना बुध्दीच्या करुणेने, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्त्री-विषयक दृष्टीने अखिल स्त्री विश्वाला न्याहाळले म्हणूनच ते स्त्रीकडे सम्यक नजरेने बघु शकले. त्यांनी आपल्या लिखाणातून बाबासाहेबांचे स्त्री विषयक विचारांचे स्वप्न साध्य करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या कृती उक्तीतून स्त्री सुधारणेचा दृष्टीकोन लक्षात येतो, अण्णाभाऊ साठेंना अपेक्षित असलेल्या नवीन समाजाच्या निर्मितीत स्त्रियांचा वाटा फार मोठा आहे. त्यांचे भारतीय स्त्री जीवनाच्या संदर्भातील विचार आज २१ व्या शतकातील स्त्रियांनाही नवीन दृष्टी देतात त्यांना प्रेरणा देतात, संजीवक ठरतात म्हणूनच प्रस्तुत शोधनिबंधकाराने या विषयाचा उहापोह करण्याचा प्रयत्न या ठिकाणी केला आहे.

**२) पध्दतीशास्त्र -**

'स्त्री' हा महत्वाचा मानवी घटक आहे. मानवी परंपरा स्त्रीशिवाय पुढे वाटचाल करूच शकत नाही. मानवी परंपरेला पुढे नेण्यात स्त्रीचा फार मोठा वाटा आहे. स्त्रीचे महत्व ओळखूनच अण्णाभाऊ साठेंनी स्त्रीच्या उत्थानाकरीता आपल्या साहित्यातून स्त्री व्यक्तीरेखांना उजागर केले. तिला मानवी हक्क मिळावेत, स्त्री स्वातंत्र्य, समानता मिळावी या पार्श्वभूमीवर शोधनिबंधनाच्या अध्ययनाकरीता संशोधनकाने 'अण्णा भाऊ साठे यांच्या कथा-कादंबऱ्यातील नायिका' हा विषय निवडला.

**३) गृहितकृत्ये -**

१) प्राचीन काळात स्त्रीला पुजनीय स्थान.

२) स्त्रीला पुजनीय स्थान देणाऱ्या देशातच तिची दुरावस्था.

३) स्त्रीची दुरावस्था पाहून अण्णा भाऊ साठेंनी स्त्रीसाठी झिजवलेली लेखणी.

४) स्त्री ही मानुस ही अण्णा भाऊ साठेंची दृष्टी असल्यामुळे त्यांनी मानवतेच्या भावनेतून कथा-कादंबऱ्यातून रेखाटलेल्या नायिका.

५) अण्णा भाऊ साठेंच्या कथा-कादंबरीतील नायिकाच्या माध्यमातून व्यक्त झालेले स्त्रीविषयक विचार आजच्या स्त्रीसाठी प्रेरक.

**४) संशोधनाचा उद्देश -**

भारतीय समाजव्यवस्थेत बळकटी आणण्यात स्त्रियांचा वाटा फार मोठा आहे. देश महासत्तेकडे आगेकुच करत असतांना स्त्रीयांना दुर्लक्षुन चालणार नाही. महापुरुषांच्या प्रेरक संजीवक विचारांतुन स्त्री मुक्तीची दारे उघडली आहेत. स्त्रीला अवकाशात झेप घ्यायची असेल तर आयुष्यभर लेखणीच्या माध्यमातून स्त्री कैवार घेणाऱ्या अण्णा भाऊ साठेंच्या प्रखर विचारांशिवाय पर्याय नाही. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत शोधनिबंधाच्या अध्ययनाकरीता शोधनिबंधकाने अण्णा भाऊ साठेंच्या स्त्री विषयक विचारांना उजागर करण्याचे

ठरवले आहे. कारण अण्णा भाऊ साठे यांनी कथा-कादबऱ्यातून सद्वर्तनी, शीलवान, चारित्र्यवान, नितीमत्ता धारण करणाऱ्या स्वभावानुसार संयमी, सोशिक, क्षमा करणाऱ्या नायिका रेखाटल्या आहेत. त्याचबरोबर अन्याय, अत्याचार, पिळवणुक होत तर पेटून उठणाऱ्या, बंड करणाऱ्या, प्रसंगी हातात शस्त्र घेणाऱ्या, महिषासुरमर्दिनीचे रुप धारण करून समोरच्याच्या राक्षसी धुळीत मिळवणाऱ्या आहेत. अण्णा भाऊ साठेंच्या कथा-कादंबऱ्यातून चित्रीत झालेल्या नायिकांच्या अभ्यासातून दिशादिग्दर्शन होवून त्या आपले उत्थान करून घेवू शकतात व यशाची नवीन नवीन शिखरे पादाक्रांत करू शकतात हाच उद्देश शोधनिबंधकाचा आहे. आधुनिक काळात या लढयाला सार्वत्रिक स्वरुप आले, स्त्री उत्थानाची वाट बिकट असली, खडतर तरी महापुरुष, समाजसुधारक, साहित्यीक यांनी आपला प्रवास थांबविला नाही, प्रयत्न थांबविले नाहीत. ज्याला ज्याला ज्या शक्य होईल तसे त्यांनी स्त्री सुधारणेच्या कार्याला अधिक गती दिली, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने स्त्रीविषयक वि आपल्या साहित्यातून अण्णाभाऊ साठेंनी उजागर केले यासाठी आपली लेखणी आयुष्यभर झिजवली.

**५) अण्णा भाऊ साठे -**

सर्व शोषितांच्या वेदना हा स्वतःच्या काळजावरचा घाव आहे असे माननारे अण्णा भाऊ साठे यांना अतिशय आयुष्य जगावे लागते. शाळेतही केवळ दीड दिवसच त्यांना जाता आले. ते शिकले ते अनुभवातून, दैनंदिन जगा समाजपुरुषाकडून, लोकविद्यापीठातून. 'इच्छा तेथे मार्ग' ही उक्ती सार्थ ठरविण्यासाठीच अण्णा भाऊ साठे यांचा जन्म झाला काय ? असे वाटावे इतपत त्यांना हवे त्या क्षेत्रात सर्व समस्यावर मात करून ते राज्य करीत राहीले. साधी अक्षरओळखही नस अण्णा भाऊ साठेंनी प्रखर इच्छाशक्तीच्या जोरावर रोजची कामे करीत, रस्त्यांवरून भटकत असतांना दुकानांवरची बो अक्षरांशी सख्य केले आणि अक्षर ओळख झालेली अण्णा भाऊची लेखनी समाजनिरिक्षणातील अनुभवातून वास्तवचित्र लागली. "वैचारिक आणि सामाजिक बांधिलकी हे त्यांच्या लेखनाचे सुत्र होय. उपेक्षित, दलित, वंचितांच्या बाजूने त उत्थापनासाठी अण्णा भाऊंनी आपली लेखणी झिजवली."[१] आपल्या लेखणामागच्या प्रेरणा सांगतांना ते वारणेच्या खोऱ्यात कादंबरीच्या निवेदनात म्हणतात, "आपण जे जीवन जगतो ज्या जीवनात आपला अन् कैक पिढयांचा जन्म झाला, ज्या जीव आपण रोज अनुभव घेत आलो आहोत, तेच जीवन ज़गणारी बहुसंख्य जनता, त्या जनतेचे विशाल जीवन, तिची जगण्याची ध किंवा संघर्ष, त्यात जनतेत वावरणारे उदात्त विचार हे सारे आपण लिखाणातून त्या आपल्या जनतेपुढे आपण मांडावे अशाच प्रेरित होवून मी आजपर्यंत लिहीत आलो आहे."[२]

पूर्वसुरींच्या कांदबऱ्यात, समकालीन साहित्यातीत तळागाळातील सर्वसामान्यांचे जीवन, त्यांचे प्रश्न यांना उजागर के गेले नाही त्यांच्या साहित्यातून केवळ एका विशिष्ट वर्गाचे, मध्यमवर्गीयांचे जीवनचित्रन, त्यांच्याच समस्या तेवढया चित्रित केल अभ्यासाअंती अण्णा भाऊ साठेंच्या लक्षात आले. म्हणूनच अनुभवातून आलेल्या शोषितांच्या आयुष्याचा पट मांडण्यासाठी त लेखणी सरसावली. "अण्णा भाऊंनी जे जग पाहिले व अनुभवले होते, जी माणसे त्यांनी पाहिली होती व ज्यांच्या सुखदुःखा समरुप झाले होते. ज्या सामाजिक विषमतेने व भांडवल प्रधान शोषणग्रस्त अर्थव्यवस्थेने तळागाळातील माणसांना तळघरात ठेवले होते व त्याला हिन व दीन केले होते त्यांच्या शोषण यंत्रनेतून पिळवटून निघालेल्या जयाजयाच्या व उत्थापनाच्या व अदम्य गोष्टीच प्रामुख्याने समाजाला उसासून सांगण्यासाठी अण्णा भाऊंनी हातात लेखणी घेतली होती."[३] शोषित पिडितांचे दु समस्यांचे चित्रण त्यांनी आपल्या साहित्याव्दारे केले. आपली माणसं त्यांच्या शौर्यगाथाही त्यांनी समाजापुढे आणले. "लढणा माणसांच्या आशावादी मनोहरी उत्तुंग गिरिशिखरे साहित्यात उभी करणे, उफाडत्या सत्याच्या जीवनव्यापी प्रपातांचे लाव्हा प्र शिल्पांकित करणे, शतकांच्या मुक नायकांच्या व्यथांचे आक्रोश शब्दबध्द करून साहित्याच्या चावडीवर पिळवटलेल्या व्यथांचा ज उभा करणे ही अण्णा भाऊंच्या लेखणापाठीमागची प्रेरणा आहे."[४]

आपली लेखन विषयक भुमिका स्पष्ट करताना अण्णा भाऊ साठे म्हणतात, "तुम्ही कथा कशा लिहिता ? असा एक प्र एका रशियन मासिकांना मला विचारला होता आणि तशाच अर्थाची मला माझ्या वाचकांकडून अनेक पत्र आहेत...माझी जीवना फार निष्ठा असून मला माणसं फार आवडतात. त्यांची श्रमशक्ती महान आहे ती जगतात, जगाला जगवतात, त्यांची बळावरच हे चालतं त्यांची झंज नित्यांच यश यावर माझा विश्वास आहे. त्यांना विद्रुप करू नये अस माझं मत आहे. वैफल्य हे तलवारी धुळीसारखं असतं नि ती धुळ झटकून तलवार लखलखीत करता येते."[५]

ISBN – 978-93-86623-44-7

सामाजिक चळवळीत 'जग बदलायचे असेल तर घाव घातले पाहिजेत' ही भूमिका बाबासाहेबांची होती, या साहित्य चळवळीत हेच घाव घालण्याचे काम अण्णा भाऊ करीत होते. लेखनीच्या घावांनी माणसाला हवा तसा आकार देत समाजातील अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्याचे काम त्यांची लेखणी करीत होती

लौकीक अर्थाने शाळेत न जाणाऱ्या अण्णा भाऊंचा साहित्यप्रवास मात्र जगाला आश्चर्यचकीत करणारा असाच होता. अण्णा भाऊ साठे यांच्या नावावर ३२ कादंबऱ्या, ८ पटकथा, ३ नाटके, १ प्रवासवर्णन, १३ कथासंग्रह, १४ लोकनाट्ये, १० प्रसिद्ध पोवाडे, १२ उपहासात्मक लेख आहेत.

प्रखर बुध्दीचातुर्य, प्रगाढ विद्याव्यासंग, उदंड आत्मविश्वास, स्वमत प्रतिपादनाची रोखठोक शैली, विषयाचे सार्वभौमित्व, नवीन वैज्ञानिक दृष्टी, अखंड निर्भयता, दलित, शोषित, स्त्री यांच्या प्रश्नांची जान, देशकल्याणाची तळमळ इत्यादी गुणांनी युक्त अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून मानवजातीला समता, दया, शांती, करुणा यांचा संदेश देत अन्यायावर घाव घालीत एकतेचा संदेश दिला. सत्याचा वारकरी निर्भयतेचा मेरुमणी, मानवतेचा महान उपासक, शोषित, पिडीत, स्त्री यांना साहित्याच्या माध्यमातून उजागर करणारा साहित्यीक, निष्ठावंत समाजसेवक, धर्मातील ढोंगबाजीवर आपल्या प्रखर वाणीने प्रहार करणारा थोर मूर्तिभंजक, स्त्रीयांचा कैवारी अशा अनेक पैलुंनी अण्णा भाऊ साठेंचे व्यक्तीमत्व सजलेला आहे.

खेडयापाडयातील आणि सामान्यातील सामान्य लोकांच्या लोकसंपर्कातून अण्णा भाऊ साठे लोकशिक्षक झाले लोकांसाठी लोककवीची भूमिका घेवून त्यांना समजतील अशी गीते लिहिली, दहा पुढाऱ्यांच्या भाषणांनी जेवढे सामाजिक प्रबोधन झाले नाही तेवढे प्रबोधन अण्णा भाऊ साठेच्या शाहीरी बाण्याने झाले.

**अण्णा भाऊ साठे यांच्या कथा-कादंबऱ्यातील नायिका –**

मनुप्रणीत समाजव्यवस्थेमुळे निर्माण झालेल्या भारतीय संस्कृतीत विशेषत: हिंदू धर्मात सर्व समाजातील स्त्रिया दुःख, अपमान व अवहेलनांचे कडवट घोट घेत जगत राहिल्या. पुरुषप्रधान व पितृसत्ताक पध्दतीच्या दबावाखाली जगत असणाऱ्या स्त्रियांच्या मनाचा सतत कोंडमारा झाला. अशा काही कोंडलेल्या मनाच्या स्त्रियांचा अण्णा भाऊ साठेंशी संपर्क आल्या. त्यांच्या कुटूंबात नातेवाईकात, परिघात, समाजात वावरणाऱ्या स्त्रियांचे जीवन त्यांनी जवळून पाहिले. चिंतन, मनन केले आणि त्यांच्या कोंडलेल्या मनाला आपल्या साहित्याच्या माध्यमातून अविष्कृत केले.

अण्णा भाऊंच्या मनावर भगवान गौतम बुध्द, महात्मा ज्योतीराव फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांच्या विचारसरनीने अधिराज्य गाजविले आहे. या महामानवांनी सामर्थ्यशाली स्त्रित्वाचे जे स्वप्न पाहिले ते स्वप्न सत्यात उतरवण्याचा प्रयत्न आपल्या लेखनीच्या माध्यमातून केला आहे. स्त्रीचा सर्वप्रथम माणूस म्हणून विचार केला. त्यामुळे माणूस म्हणून आलेले स्त्रीचे सगळे भले-बुरेपण त्यांच्या स्त्रीपात्रातून आपल्या दृष्टीपथात येते.

अण्णा भाऊंनी पारंपारिक स्त्री दृष्टीकोनाला मुठमाती देत आपल्या न्याय हक्काची जाणीव झालेल्या, नव्या विचारांच्या स्त्रीमनाचे रेखाटन केले आहे. त्यांची लेखणी पारंपारिक वारसा जतन करण्यासाठी नाही तर आजवर स्त्रियांना ज्या जोखडात बंदिस्त करुन ठेवले होते. त्यांच्यासाठी धारदार शस्त्राच्या रुपाने पुढे आली. त्यांनी आपल्या लेखणीला शस्त्र बनवून पारंपारिक चौकटी पार मोडून, तोडून टाकल्या हिंदू धर्मातील रुढी परंपराच्या भिंती उध्वस्त केल्या.

अण्णा भाऊंच्या माणसकन्या हया दलित, कष्टकरी, शेतमजूर, कामगार, झोपडपट्टीत राहणाऱ्या कष्टकरी तसेच उच्चवर्णीय समाजातीलसुध्दा आहेत. सर्वंच जातीतील स्त्रीयांची 'क्षुद्र' म्हणूनच गणना होत असल्यामुळे त्यांनी या शोषीत स्त्रियांना न्याय मिळावा म्हणून तो क्षुद्र कनिष्ठ की उच्च असे न ठरवता जात, धर्म, पंथ विरहीत स्त्रीपात्राचे रेखाटन केले आहे. त्यांच्या नायिका धाडसी, सुशील आहेत. त्या प्रथम दर्शनी हतबल वाटत असल्यातरी अन्याय-अत्याचाराची जाणीव होताच पेटुन उठतात, आक्रमक होतात.

चित्रा, वैजयंता, आवडी, रत्ना चंदन, डोळे मोडीत राधा चाले, चिखलातील कमळ, संघर्ष, रानगंगा, अलगुज या कादंबऱ्या स्त्रीप्रधान आहेत. तर गंगु, फुला, राणी, राधा, बिलवारी, निल्ली, मंकी, हौशी या कथेतल्या नायिका, स्त्री-विषयक समस्यांना प्रश्नांना उजागर करणाऱ्या आहेत. चंदन ही विधवा स्त्री पतीच्या माघारी वासनेने बरबटलेल्या नजरा चुकवत जगत असते आपल्या पिलांना जगवत असते. अनेकजन तिच्या शीलावर घाला घालण्यासाठी टपून असतात ती मात्र कोणलाही दाद न देता लढाऊपणाने जगते. तिच्यावर बलात्कार करायला आलेल्या दयारामच्या अंगावर ॲसिडचा डब्बा फेकते.

'चित्रा' मधील 'सोनाला' तिच्या मामानेच उध्वस्त करीत वेश्याव्यवसायात ढकलले आहे. जेव्हा तिचा मामा तिच्या बहिणीलाही या व्यवसायात आणण्याचा प्रयत्न करतो तेव्हा मात्र ती चवताळते संघर्ष करते. तुझ्या अब्रुची होळी करणाऱ्या जगाची

ISBN – 978-93-86623-44-7

होळी होईपर्यंत जग असा संदेश देत ती चित्रालाही संघर्ष करायला भाग पाडते. चित्राही अन्यायाविरुध्द, पिळवणुकीविरुध्द लढते, पळून जाऊन आपले चारित्र्य जपते. या स्त्रीपात्राच्या रेखाटनातून अण्णा भाऊ साठयांनी स्त्रियांना स्वाभीमानाने, नितीमत्तेने जगा. कोणी जर तुमच्या अब्रुवर घाला घालीत असेल तर मात्र प्रतिकार करा लढा, हरु नका, अब्रु घेणाऱ्याची गय करू नका तर अब्रु घेणाऱ्याला जाळा असाच जणुकाही संदेश दिला आहे.

अत्यंत प्रतिकुल परिस्थिती असेल तरी घाबरुन जाऊ नका तर संघर्ष करा असा संदेश देणारे स्त्री-रेखाटन त्यांनी 'वैजयंताच्या' माध्यमातून केले आहे. म्हणून बलात्काराचा हेतू मनात ठेऊन आलेल्या चंदुलाल सारख्याला ती ठोकरते आणि प्रियकर उमा बरोबर लग्न करते स्त्रीला चारित्र्य आणि ते सांभाळण्याचे लढाऊ सामर्थ्य असते ती अबला नसून क्रांतीकारी सबला आहे. याची मराठी साहित्यात ठळक नोंदणी आपल्या स्त्री पात्रांव्दारे अण्णा भाऊंनी केली आहे.

परंपराची चौकट मोडणारी स्त्री 'आवडीच्या' माध्यमातून अण्णा भाऊ साठेंनी चितारली आहे. आवडी ही तात्याना मुलगी, नाना चौगुल्याची बहिण, तर भगवान पाटलांची सून आहे. फेफरे येणाऱ्या मुलाशी केवळ खोटया प्रतिष्ठेपायी आपले लग्न लाऊन दिले असे जेव्हा तिच्या लक्षात येते तेव्हा ती आपल्याला फसवल्या गेले या विचाराने चिडते, संतापते. आपल्यावरील अन्यायाचा बदला घेण्यासाठी घरंदाजपणाची चौकट मोडून धनाजी रामोश्याशी लग्न करते. हिन्दू धर्मातील जुनाट, प्रतिगामी विचारांना ठोकर मारून अण्णा भाऊंच्या नायिका नव्या पुरोगामी विचारांना सोबत घेऊन आपल्या जीवनाची वाटचाल करतात. वारणेच्या खोऱ्यातील 'मंगला' ही भारतीय परंपरा जपणारी परंतु स्वातंत्र्यलढयात योगदान देणारी आहे. प्रेमापेक्षा कर्तव्य, राष्ट्रभक्ती श्रेष्ठ या विचाराने हंबीररावाला साथ देते नि त्याच्याच सोबत आपल्या जीवाचे बलीदानही देते. भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ मानणारी राष्ट्रभक्ती नसानसात असणारी भूमीगत क्रांतिकाऱ्याची प्रेयसीच्या रुपाने मृत्युशी खेळणारी मंगला अण्णा भाऊंनी उभी केली आहे. मृत्यु तथा अब्रुच्या भितीने दागिणे द्यायला तयार झालेल्या स्त्रियांना 'मी खजिना न्हेणार हाय, तुम्हासी ओरबाडायला मी आलो न्हाय. कारण अब्रु खाऊन उपाशी माणसं जगत नसतात' असा म्हणणारा दरोडेखोर असुनही, माणुसकीला जपणारा, स्त्रियांना सन्मान देणारा नायक फकीरा या कादंबरीतून उभा केला आहे. 'फुलपाखरुत' रिमांड होममधील उध्वस्त झालेल्या 'रोहिणीच्या' माध्यमातून तर 'रत्ना' या कादंबरीतून देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकाच्या खेडयापाडयातील नायकांचे जीवन किती असुरक्षित असते हे समाजाच्या समोर आणतात. अहंकार हे दुःखाचे कारण आहे 'अवंतिका' स्वतः विषयीच्या अहंकाराने स्वतःचे आयुष्य उध्वस्त करुन घेते तेव्हा अहंकारापासून मुक्त होण्याचा संदेश या व्यक्तिचित्रणाच्या रेखाटनातून अखिल स्त्रिविश्वाला देतात.

अर्धा इनाम जमीन देण्याची गावात वाडा बांधून देण्याची आणि सोन्याने मढविण्याची ऑफर आलेली असतांना अनाथ असणारी 'मंजुळा' घरंदाज आनंदराव पाटीलाला धुडकावते. 'संपत्तीपेक्षा अब्रु महत्वाची' मानणारी मंजुळा 'खुळंवाडी' या कथेत आहे. स्त्रीने दिल्या घरीच राहावे किंवा दिल्या घरीच मरावे हा भारतीय संस्कृतिचा नियम, रुढी परंपरा सांगते. अण्णा भाऊंची विधवा नायिका निल्ली मात्र ही परंपरा नाकारत हैदर बरोबर पळून जात. कंजार जमातीतील जातपंचायतीच्या नियमाला ठोकरते. अण्णा भाऊंनी आपल्या साहित्यात नितिमत्तेला महत्व दिले आहे. उमा, बळी, सुभद्रा आणि लींला या पात्रांच्या माध्यमातून नितिमत्तेचा मानदंड ठरणारी 'प्रायश्चित' ही कथा आली आहे. नितिमत्ता जपण्यासाठी चार जिवांनी केलेले बलिदान आणि घोर प्रायश्चित्त बघून संवेदनशील वाचक कोलमडून पडतो. वडिलांच्या मानहानीचा सुड घेणारी घिरोदात्त नायिका 'फुला' ही गुंडाच्या घराला पेटवते. "सुड घेणारी स्त्री वास्तवात नसली तरी आपल्या लेखनकृतीत उभी करणे हे अण्णा भाऊंनी जाणीवपूर्वक केलेले कर्तव्य समजले पाहिजे. अण्णा भाऊंना अन्यायाखाली भरडणारी स्त्री नको आहे, अत्याचाराने वाकलेली नको आहे. नरपशुंच्या लिंगपिसाटपणाची शिकार झालेली अबला नको आहे, स्त्री ही बाणेदार आणि धाडसी असावी, किंबहूना ती तशीच असते,"[६] हा अण्णा भाऊंचा स्त्रीविषयक दृष्टीकोन त्यांच्या साहित्यातून स्पष्ट होता.

अण्णा भाऊंच्या नायिका अन्याय अत्याचार सहन करीत कुढत न बसता पेटुन उठत असल्या तरी माणसाकडे माणूस म्हणून पाहणाऱ्या आहेत. प्रेमळ, सोशिक आहेत. "त्या स्त्रिया गरिब असून दारिद्रयाशी चिवटपणे झुंज देत असतात. नवऱ्यावर, मुलांवर, कुटूंबातील माणसांवर त्यांचे निरातिशय प्रेम असते. नवऱ्याशिवाय त्या दुसऱ्या कुणाचाही विचार करीत नाहीत. परपुरुषाबद्दल तिला भय असते. अशी ही दलित, दुर्बल स्त्री प्रसंगी धैर्यवान बनते आणि तिच्या अब्रुची टवाळी करू पाहणाऱ्यांच्या नरडीचा धोट घेण्यासाठी नागिणीसारखी फुफ्कार करते. त्याचवेळी तिची, निर्भयता, तिचे डोळे, तिच्या धमण्यातून वाहणारे रक्त, तिच्या लालबुंद चेहरा यांचे सुक्ष्मपणे केलेले निरिक्षण अण्णा भाऊंच्या लेखणात प्रत्ययकारी आले आहे. पदर कमरेला गुंडाळून

ISBN – 978-93-86623-44-7

धुडकाऊ घेऊन प्रतिघात करणारी स्त्री अण्णा भाऊंना आवडते आणि तिच्या स्वभावाच्या विविध छटा रंगविण्यात ते आनंद त्यात ते गुंगून जातात. हे त्यांच्या कादंबऱ्या वाचताना स्पष्ट होते. नव्याने लग्न होवून आलेली दलित घरची सून पहिल्यासाठी पाटलाच्या पाटीलवर वस्तीला जायला पाहिजे या अनेक वर्षांपासून चालत आलेल्या शिरस्त्यावर थुंकणाऱ्या आणि पाटलाला हिसका दाखविणाऱ्या रणरागीणी अण्णा भाऊंच्या लेखणात आढळतात.''७

अण्णा भाऊंनी चितारलेल्या नायिका विरांगणा आहेत. गावकुसाबाहेर उपेक्षित समाजात राहणाऱ्या तसेच बहुजन समाजातील आहेत. अण्णा भाऊंच्या स्त्रीकडे बघण्याचा दृष्टीकोन मानवतेचा आहे म्हणूनच ते स्त्रीकडे माणूस म्हणून पाहतात. तिला आधार नाही तर निडर बनवतात व रेखाटतात म्हणूनच प्रा.सौ. कलावती गायकवाडांचे ''कथा कादंबऱ्यामधून स्त्रियांवर गुदरणारे अनेक बाका प्रसंग त्यांनी अत्यंत संयमाने वर्णिले आहेत. स्त्रीची अब्रु लुटणारी माणसं अनेक लेखकांनी रंगवली आहेत. अण्णा भाऊंची पात्रं आपल्या भयानक व राकट दरोडेखोरांच्या हातून स्त्रिची अब्रु वाचवितांना दिसतात. अण्णा भाऊंच्या साहित्यातील स्त्री पात्रांची कुणाला व अब्रुचे रक्षण होतांना दिसते.''८ हे मत तसेच ''अण्णा भाऊंच्या साहित्यातील स्त्रीदर्शन गंभीर आणि भारतीय जीवनातून उभ्या राहिलेल्या जीवनविषयक तत्वज्ञानाला गौरवास्पद असे आहे. या देशात कुणीही स्त्रीचा जन्म घेवू नये, घेतला तर सुंदर असू नये, सुंदर असेल तर तरुण असू नये, तरुण असेल तर दरिद्री असू नये, दरिद्री असेल तर उपेक्षित, अस्पृश्य असू नये आणि हे ही सारे असेल तर किमान 'माकडीचा माळ' या कादंबरीतील नायिकेसारखे उघडयावर अब्रचे रक्षण करीत भटकण्याचे दुर्दैव तरी तिच्या नशिबी येवू नये असे अण्णा भाऊंच्या साहित्यातील चित्रणाकडे पाहतांना वाटते.''९ हे डॉ. बाबुलाल गुरवांचे मत पटते.

एकंदरीत, अण्णा भाऊंच्या नायिका परिस्थितीला शरण जाणाऱ्या नाहीत तर प्राप्त परिस्थितीला तोंड देत त्यावर विजय मिळविणाऱ्या आहेत शील चारित्र्य, अब्रु जपत त्या आयुष्याची, जीवनाची वाटचाल समर्थपणे करतात. समोर आलेल्या प्रश्नांना थेट भिडतात. दुःख देणाऱ्या आणि दुःखी करणाऱ्यांना थेट जाळून मारण्याची पोकळ वल्गना करीत नाहीत तर तो सत्यात उतरवितात. ती जीतकी मायाळू, कनवाळु, कुटूंबवत्सल आहे तेवढीच ती निडर, धिरोदात्त, स्वतंत्र्य व्यक्तीमत्व असणारी, 'अन्यायाविरुध्द चिड परि मानवतेची भीड' असणारी, जुनाट, प्रतिगामी विचारांना झीडकारत नवी स्वप्न, आशा, आकांक्षा, नवविचार मनात रुजवत नव्या जगाचे आव्हान पेलत समर्थपणे वाटचाल करणारी, सोबत येणाऱ्यांना सोबत घेऊन, अडविणाऱ्यांना समर्थपणे तोंड देऊन, ध्येयाच्या मार्गात आडवे येणाऱ्यांना लोळवून नव्या जगाकडे मार्गक्रमण करणारी, जगत असतांना चुका झाल्यास प्रायश्चित देणारी, प्रसंगी प्रायश्चित्त घेणारी 'स्त्री' अण्णाभाऊ साठेच्या लेखणीतून अविष्कृत झाली आहे.

**समारोप -**

महापुरुषांच्या समर्थ विचार वारसा घेवून आजची स्त्री मार्गक्रमन करीत आहे. एकीकडे सर्वच क्षेत्रात तिने यश मिळवले तरीही दुरुस्तीकडे ग्रामीण भागातील स्त्रियांना आजही मोठया प्रमाणात विविध समस्यांना सामोर जावे लागत आहे. स्त्रियांचा माणूस म्हणून विचार व्हावा. या भावनेने अण्णाभाऊंनी आपल्या कथा कादंबरीच्या माध्यमातून स्त्रीविषयक विचार मांडले, स्त्री व्यक्तिचित्रणाच्या माध्यमातून ते समाज मनावर रुजविले, बिंबवले.

२१ व्या शतकाकडे वाटचाल करतांना स्त्रियांना, कौटुंबिक, सामाजिक, आरोग्य, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, जागतिकीकरण या पातळयांवरील समस्यांना तोंड द्यावे लागते. या सर्व प्रश्नांची उत्तर अण्णाभाऊ साठेंच्या स्त्रीविषयक विचारधनात मिळतात म्हणूनच आजच्या स्त्रीने अण्णाभाऊ साठेच्या विचारधनाची पेटी सोबत घेतली, आत्मपरिक्षण करून स्वतःच्या मानसिकतेत परिवर्तन केले, स्वतःची कार्यक्षमता वाढवून वाटचाल केली तर आकाश पेलनं फारस कठीण नाही. अण्णाभाऊंचे विचार आजच्या स्त्रिलाही निश्चितच मार्गदर्शक प्रेरक, संजीवक ठरतात.

**निष्कर्ष :**

१) प्राचीन काळी स्त्री सक्षम आर्यक्रमनानंतर स्त्री गुलाम, बंदीस्त कार्यक्षेत्र चुल-मुल.

२) महामानव समाजसुधारकांनी स्त्रीमुक्ती, उध्दारासाठी प्रयत्न केले.

३) अण्णाभाऊ साठेंचा स्त्री विषयीची उदार, उदात्त दृष्टीकोण. त्यामुळे त्यांनी आपल्या कथा कादंबऱ्यातील नायिकांच्या माध्यमातून स्त्रीच्या माणूसपनाचे चित्रण केले.

४) अण्णाभाऊ साठेंची नायिका एकीकडे कुटूंबवत्सल तर दुसरीकडे अन्यायविरोधात शस्त्र उचलणाऱ्या आहेत तर दुसरीकडे शील, अब्रुवर घाला घालणाऱ्यांना धडा शिकविणाऱ्या आहेत.

५) प्रगतीकडे वाटचाल करणाऱ्या स्त्रियांच्या प्रश्नांची संख्या आज वाढते आहे.